## 7. सेवानिवृत्तीवेतन -

**अ** - महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाल्यास त्यांचे सेवानिवृत्तीवेतन प्रकरण मा.महालेखापाल कार्यालयास सादर करताना आवश्यक असणारे कागदपत्रे -

1. **मूळ सेवापुस्तकातील नोंदी** - शासकीय कर्मचाऱ्याच्या मूळ सेवापुस्तकातील सर्व नोंदी पूर्ण असणे आवश्यक आहे. शासकीय कर्मचाऱ्याचे सेवा पुस्तकाची वेतनपडताळणी झालेली असणे आवश्यक आहे. सेवा पुस्तकात स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद असणे आवश्यक आहे. सेवापुस्तकातीत सर्व नामनिर्देशन अदयावत करणे आवश्यक आहे उदा. सेवा उपदान नामनिर्देशन, कुटूंबाचा तपशिल, गटविमा योजना नामनिर्देशन, भविष्य निर्वाह निधी नामनिर्देशन.

2. **मा.महालेखापाल यांचे रजावेतन अंशदान व सेवानिवृत्तीवेतन अंशदान चे NOC प्रमाणपत्र** - शासकीय कर्मचारी सेवाकालावधीत जर प्रतिनियुक्ती किंवा स्वीयेतर सेवेत असेल तर अशा सेवेच्या कालावधीत त्यांचे रजावेतन अंशदान सेवानिवृत्तीवेतन अंशदान स्वीयेतर नियोक्त्याने शासनास भरणे आवश्यक आहे. असे अंशदान भरलेबाबतचा तपशिल मा.महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

3. **सेवानिवृत्तनाकरीता बँकेत खाते** उघडणे आवश्यक आहे. सदर खाते उघडल्यानंतर त्याचे पासबूकचे प्रथम पृष्ठांची छायांकित प्रत कार्यालयास सादर करावी.

4. सेवानिवृत्तीवेतन प्रकरणासोबत **आधार कार्ड, पॅन कार्ड तसेच पत्नी/पती यांचे सोबतचा JOINT** फोटो-6 प्रतीत सादर करणे आवश्क आहे.

5. सेवानिवृत्तीवेतन प्रकरण तयार करणेकरीता **महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नमूना 5, नमूना 6 व अंशराशीकरण करावयाचे असल्यास नमूना ब** ई. भरून कार्यालय प्रमुखांना सादर करणे आवश्यक आहे.

6. कुटूंब निवृत्तीवेतनाकरीता **महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नमूना 12** भरून कार्यालयाप्रमुखांना सादर करणे आवश्यक आहे.

**ब - राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांनी खालील प्रमाणे नामनिर्देशने कार्यालय प्रमुखांना सादर करणे आवश्यक आहे.**

**1.** राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांनी सदर योजनेचे सदस्य होताना नामनिर्देशन देणे आवश्यक आहे.

2. शासन निर्णय, वित्त विभाग- दि.31.03.2023 मधील तरतूदीनुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असणाऱ्या कर्मचाऱ्यांना

1. सेवेत असताना मृत्यु झाल्यास कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यु उपदान
2. रुग्णता सेवानिवृत्त् झालेल्या कर्मचाऱ्याना रूग्णता निवृत्तीवेतन व सेवा उपदान
3. शासन सेवेतून सेवा निवृत्त् होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा उपदान

लागू करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर शासन निर्णयासोबत असलेल्या विहीत नमुन्यात विकल्प व कुटुंबाचा तपशिल देणे आवश्यक आहे.